# सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

अ/०६, ५१,५२,५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

संदर्भ क्र. : SCN Assoc./ ०५/२०२५ दिनांक : १२/०१/२०२५

**परिपत्रक क्र.- १७**

प्रति,

मा.अध्यक्ष / सचिव,

सराफ चौधरी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (क्र.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ व बी-१५)मर्या.

सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल,कांदिवली पूर्व, मुंबई ४००१०१.

महोदय/ महोदया,

सराफ चौधरी नगर वसाहतीतील संस्था क्र. १ ते १४ चे सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येत आहे कि,कृपया दिनांक १९/०१/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेचे अवलोकन करावे.

सराफ चौधरी नगर संकुलाचा समूह पुनर्विकास करणे संबंधी सर्व १ ते १४ संस्थांचे सर्व सभासदांची असोसिएशनच्या वतीने विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १९/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वा एस सी एन टेनिस ग्राउंड, ठाकूर विद्या मंदिर समोर कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१ येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर सभेची विषयांकित पत्रिका सर्व १ ते १४ संस्थेतील सर्व सभासदांना हस्ते पोच/कुरिअरने वाटप करण्यासाठी असोसिएशनने १ ते १४ संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. संस्थांच्या बाहेर राहण्याऱ्या सभासदांना असोसिएशन मार्फत विषयपत्रिका कुरिअर व्दारे पाठिवण्यात आली आहे. तरी सर्व संस्थेतील सभासदांना सभेची विषयपत्रिका प्राप्त झाली असेल. सर्वांनी सभेस विहित वेळेत हजर राहावे. सभेत विषयांकीत पत्रिकेनुसार सभागृहात उपस्थितांमध्ये चर्चा विनिमय होऊन निर्णय घेण्यात येईल.

ज्या सभासदांना पुनर्विकास प्रकल्प प्रक्रिया विषयी काही समस्या /शंका /प्रश्न असतील त्यांनी असोसिएशन कार्यालयात सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० वाजेच्या दरम्यान प्रत्यक्षात/ समक्ष भेटून निराकरण करावे किंवा लेखी पत्र देऊन विचारावे. त्या अनुषंगाने त्यांचे शंका /प्रश्न व समस्यांचे निराकरण करण्यात येईल.

ज्या सभासदांना लेखी म्हणणे द्यायचे असेल त्यांनी त्यांचा लेखी अर्ज दिनांक १६/०१/२०२५ रोजी सायंकाळी ५:०० वा. असोसिएशनच्या कार्यालयात देण्यात यावा. जेणे करून दिनांक १९/०१/२०२५ रोजी होणाऱ्या विशेष सर्व साधारण सभेमध्ये स्पष्टीकरण देणे सुलभ होईल. सभासदांचे निराकरण होणेस्तव समन्वय समिती (Coordination Committee) असोसिएशनने नियुक्ती केली आहे.

सभेत उपस्थित सभासदांपैकी ज्यांचे इंग्रजी वाचन ज्ञान उत्तम असेल त्या सभासदांकरवी सोनम विकासकाचे आलेले पत्र सभागृहातील उपस्थितांसमोर वाचन करण्यात सांगण्यात येईल. तदनंतर त्यावर चर्चा करण्यात येईल.

संकुलातील सर्व इमारतींची अवस्था जीर्ण झाली असून त्यांचे स्लॅब कोसळणे, भिंतींना भेगा पडणे, व पाणी गळती सुरू असणे यामुळे अप्रिय घटना घडू शकते. संस्थेने रिपेरिंग करून सुद्धा वरील समस्या चालूच असतात.

संस्थेला/सभासदांना इमारती व सदनिकांना नेहमी दुरुस्ती/ डागडुजी करणे परवडण्याजोगे नाही. यास्तव सभासदांना उत्तम बांधकाम व सुख सोयी युक्त सुशोभित असे मोठ्या स्वरूपाचे स्वप्नपूर्ती घर मिळण्याकरिता कायदेशीररित्या पुनर्विकास प्रक्रियेचे कार्य हे मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे व मा.उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा यांचे अध्यक्षतेखाली ७९(अ) व शासनाच्या अटी व शर्तीचे तसेच दिनांक ०४/०७/२०१९ चे शासन निर्णयास अधीन राहून पुनर्विकास प्रक्रिया पार पाडीत आहोत. यामध्ये कोणतेही चुकीचे किंवा बेकायदेशीर काम होणार नाही याची असोसिएशन सर्व सभासदांना ग्वाही देत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

सभासदांचे हितार्थ गुणवंतापूर्ण मोठ्या घराची स्वप्नपूर्ती साकार होणेस्तव पुनर्विकासात सर्व सभासदांनी एकत्रितपणे एकजुटीने राहून सहकार्य करावे अशी आम्ही अपेक्षा बाळगतो. कृपया सर्व सभासदांनी सभेला विहित वेळेत न विसरता हजर राहावे ही विनंती

२..

# सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

अ/०६, ५१,५२,५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.


संदर्भ क्र. : दिनांक : १२/०७/२०२५



पुनर्विकास प्रकल्पाचे व असोसिएशनचे कामकाजाची माहिती वेळोवेळी सराफ चौधरी वसाहतीतील सर्व सभासद/ रहिवाशांना कळविण्याचे तजवीज ठेवली आहे.

कार्यकारिणी समिती व उपसमिती यांच्या मान्यतेने,

आपले विश्वासू,

सराफ चौधरी नगर को-ऑप. हौ. सोसायटीज असोसिएशन लि. नोंदणी क्र. एमयुएम/एमएचएडीबी/ जीईएन/ओ/१३५२३/ २०२२-२०२३

अध्यक्ष — विक्रम द. चौधरी

सचिव — रघुनाथ बा.दळवी

सराफ चौधरी नगर को-ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि.

टीप:- १ ते १४ संस्थांच्या अध्यक्ष / सचिव यांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक आप-आपल्या संस्थेतील सर्व सभासदांना देण्याची व्यवस्था करावी.